जा.क्र.साआ/प्रशा-१/संगणक देखभाल करार/२०
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-०५
दिनांक :- २९ जुन २०२०

## निविदा प्रकटन

साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य , साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ या राज्य शासनाच्या कार्यालयात ६० संगणक / ७ लॅपटॉप, (Acer, Lenovo), प्रिटंर्स (Samung/HP), स्कॅनर्स (Canon/Epson) आहेत. सदर संगणकावर / लॅपटॉपवर कार्यालयीन कामकाजासाठी वेळोवेळी लागणारे सॉफ्टवेअर इन्स्टॉलेशन, नेटवर्कींग, इंटरनेटसह दुरुस्तीचे काम करावे लागणार आहे. सदर करार हा (Non Comprechencive) स्वरुपाचा असून या कामासाठी जे इच्छुक व्यक्ती असतील त्यांनी आपले किमान दर सीलबंद पाकीटामध्ये संचालक (प्रशासन), साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ४ था मजला, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांचेकडे **दिनांक १० जुलै २०२० पर्यत सकाळी ११.०० वाजेपर्यत** आणून द्यावे. या दिनांकानंतर येणाऱ्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

सदर निविदा साखर संचालक (प्रशासन) , महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेसमोर उघडण्यात येतील. देखभाल करार दराबाबत आयुक्त साखर यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहील. सदर निविदा **दि. १३ जुलै २०२० रोजी दुपारी १२.०० वाजता** साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, साखर सकुंल, शिवाजीनगर, पुणे-०५ येथे उघडण्यात येतील.

पात्र निविदाधारकांचे दर किमान असतील त्या निविदाधारकाबरोबर वरीलप्रमाणे नमूद केलेले काम करुन घेणेसाठी एका वर्षाचा देखभाल करार करण्यात येईल. सदरचा करार रु. ५०० चे स्टॅम्पवर करण्यात येईल. कराराचा खर्च निविदाधारकास करावा लागेल.

**संचालक (प्रशासन)**
**साखर आयुक्त कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**